|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## विकास विभाग

कबचौउमवि/११ए/नॅक/११३/२०२३ दिनांक- २६/०५/२०२३

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र**
**विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे**
**मा.प्राचार्य तसेच मान्यताप्राप्त संस्थाचे मा.संचालक यांना..**

**विषय :-** अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत...

**संदर्भ :-** मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील पत्र क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/६४६१, दि.२३/०५/२०२३.

**महोदय/महोदया,**

यापत्रासोबत वरील संदर्भीय पत्राची प्रत जोडलेली असून कृपया सदर पत्राचे अवलोकन व्हावे, ही विनंती. सदर पत्रान्वये कळविले आहे की, अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. तसेच नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरू करून दि.३१ मार्च,२०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करून IIQA नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. तरी सदर दिनांकापर्यंत IIQA नॅक कार्यालयात सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल, असे ही संचालनालयाच्या पत्रात नमुद केलेले आहे. आणि अद्यापावेतो एकदाही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. आणि जी महाविद्यालय पुर्तता करण्यास कसुर करील तेव्हा अशा महाविद्यायांना किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतेही संलग्नता देण्यात येणार नाही, अशी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) नूसार तरतुद करण्यात आल्याचे वरील पत्रात नमुद करण्यात आलेले आहे.

यासंदर्भात प्राप्त आदेशान्वये आपणास कळविण्यात येते की, मा.उच्च शिक्षण संचालनालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन, मानांकन व पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन करणार नाहीत अशा महाविद्यालयाबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदींचा अवलंब महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कार्यवाही विद्यापीठाकडून केली जाईल आणि प्रवेश प्रक्रिया थांबविली जाईल.

...२...

☎ : (९१) ०२५७-२२५८४०९ (कार्यालय)
(९१) ०२५७-२२५७४२१-४२५
फॅक्स : (९१) ०२५७-२२५८४०३ व २२५८४०६

वेबसाईट : www.nmu.ac.in

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

**विकास विभाग**



तरी, कृपया आपल्या महाविद्यालयांचा/परिसंस्थेचा अहवाल **दि.१५/०६/२०२३** पर्यंत विद्यापीठाच्या विकास विभागास पाठवावा आणि सदर पत्राची प्रत विद्यापीठाच्या संलग्नता आणि प्रवेश/पात्रता विभागकडे स्वतंत्रपणे पाठवावी, ही नम्र विनंती. आपल्या महाविद्यालयांकडून/परिसंस्थांकडून प्राप्त होणाऱ्या माहितीच्या आधारावरून विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयनिहाय अहवाल उच्च शिक्षण संचालनालयास पाठविण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सहा.कुलसचिव
विकास विभाग

**सोबत :-** वरिलप्रमाणे

**प्रत सविनय सादर :-**
१. मा.प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा.कुलगुरु महोदय यांचे कार्यालय,कबचौउमवि,जळगाव.
३. मा.प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय,कबचौउमवि,जळगाव.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी सविनय सादर.**
१. मा.उपकुलसचिव, संलग्नता विभाग/ कबचौउमवि,जळगाव.
२. मा.उपकुलसचिव प्रवेश पात्रता विभाग, कबचौउमवि,जळगाव.

महोदय, आपणास विनंती करण्यात येते की, संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याकडील उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कार्यवाही करणार नाहीत अशा महाविद्यालयाबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदींचा अवलंब करण्यात यावा, ही नम्र विनंती.

☎ : (९१) ०२५७-२२५८४०९ (कार्यालय)
(९१) ०२५७-२२५७४२१-४२५
वेबसाईट : www.nmu.ac.in

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय,
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००१.
www.dhepune.gov.in फोन नं.०२०/२६१२२११९. Email: mavi.dhepune@nic.in

क्र.एनजीसी/२०२३/नॅक/अशा.अनु.म.वि./औवि/मवि-३/ ६४६२ दि.२३.०५.२०२३

23 MAY 2023

**अत्यंत महत्वाचे/कालमर्यादित.**

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय -अशासकीय महाविद्यालयांच्या नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन व मानांकनाबाबत.**

**संदर्भ -** १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१०/(२०/१०)/विशि-३ दि.०८.१०.२०१०.
२.संचालनालयाचे क्र.एनजीसी/२०२२/नॅक/औवि/मवि-३/१०१०० दि.२७.०७.२०२२, १२२०४ दि.०३.१०.२०२२/६७८ दि.२५.०१.२०२३. व ३१७७ दि.२५.०१.२०२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयानुसार अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांचे मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन अनिवार्य करण्यात आलेले आहे. यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये अपेक्षित वाढ होऊन उच्च शिक्षणाचा दर्जा वाढण्यास मदत होते.

उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेचे जतन व संवर्धन व्हावे याकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाने नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणेबाबत निर्देशित केले आहे. या अनुषंगाने संचालनालयाने वेळोवेळी विभागातील शासकीय/अशासकीय महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणेबाबत निर्देशित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची तरतूद नमूद केली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथील याचिका क्र.५२८०/२०१५ मधील दि.१६.११.२०१६ च्या निकालातही नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व अधोरेखित केले आहे.

राज्याची प्रगती होण्यासाठी व जागतिकीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार उच्च शिक्षण मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा उंचावणे व त्याची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे. याकरिता महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाचे महत्व व अनिवार्यता वेळोवेळी अधोरेखित केली आहे. संचालनालयाचे दि.०२ मार्च, २०२३ च्या पत्रान्वये राज्यातील नॅक वैधता संपुष्टात आलेल्या महाविद्यालयांनी **"नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दि.३१ मार्च, २०२३ पर्यंत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे. या दिनांकापर्यंत IIQA सादर न केल्यास शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रथम वर्षाच्या प्रवेशास निर्बंध लागू करणेबाबत शासनास प्रस्तावित करण्यात येईल" असे कळविण्यात आले होते.**

तथापि, बहुतांश पात्र महाविद्यालयांनी अद्यापपावेतो नॅक कार्यालयास नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन प्रारंभ टप्यातील संस्था नोंदणी (HEI Registration) करुन IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर केला नसल्याचे नॅकच्या संकेतस्थळावरुन निदर्शनास आले आहे. उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी निर्देश देवूनही महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेतलेले नाही ही बाब शैक्षणिकदृष्ट्या योग्य नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ होणे व शैक्षणिक गुणात्मक दर्जा वाढीसाठी नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करुन घेणे आवश्यक आहे.

सबब, अद्यापपावेतो एकदाही नॅक मूल्यांकन व मानांकन न झालेल्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये व सद्यस्थितीत नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन INACTIVE असलेल्या अशासकीय अनुदानित विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत IIQA (Institutional Information for Quality Assessment) नॅक कार्यालयास सादर करणे अनिवार्य आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १०९ मधील पोटकलम ६(ख) मध्ये महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकनाची

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ मधिल पोटकलम ०६ (ख) नुसार

**(ख) राज्य शासनाने निर्धारित केलेल्या शर्तींचे ते अनुपालन करीत नसतील तर,राज्य शासनाकडे पाठविणार नाही." अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.**

**तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० मधिल पोटकलम (४) नुसार "महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृती किंवा, यथास्थिति, पुनर्रअधिस्वीकृती मिळण्यासाठी पात्र आणि अपेक्षित असेल आणि असे महाविद्यालय किंवा परिसंस्था अधिस्वीकृतीच्या किंवा पुनर्रअधिस्वीकृतीच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यात कसूर करील तेव्हा, अशा महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला विद्यापीठाकडून कोणतीही संलग्नता देण्यात येणार नाही."** अशाप्रकारे तरतूद करण्यात आलेली आहे.

सबब, वर नमूद करण्यात आलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदी व शासन निर्णयात नमूद केलेल्या नॅक मूल्यांकन,मानांकन व पुनर्मूल्यांकन करण्यासाठी अटी व शर्तीचे पालन आपल्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जे महाविद्यालये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाच्या प्रारंभ दिनांकापर्यंत करणार नाहीत अशा महाविद्यालयांबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील उपरोक्त नमूद सर्व तरतूदीचा अवलंब करुन महाविद्यालयांची संलग्नता काढून घेण्याची कारवाई विद्यापीठांनी करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार सर्व विद्यापीठांनी अशा महाविद्यालयांच्या प्रारंभ दिनांकापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाविद्यालय निहाय संचालनालयास सादर करावा.

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
**प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रत- माहितीस्तव सादर**

१.मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
२.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२